## विशेष दिवाणी दावा क्र. २५१/२०२२ मध्ये निशाणी ६५ खाली आदेश

( राजेंद्रकुमार शिंदे वि. जयश्री शिंदे व इतर )

[CNR No.MHSO12-000721-2022 ]

प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादी क्र.५ विरुध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ५ ने नि.क्र.७२ अन्वये म्हणणे देवून अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहेत व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३) सदर अर्जावर वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी म्हणणे देवून अर्जातील कथने मान्य करून मागणी प्रमाणे मनाई हुकूम देण्याची वादीची हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

४) दोन्ही पक्षांच्या परस्पर विरुध्द कथनांवरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असून सदरचे मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रथम दर्शनी वाद सिध्द केला काय ? | नकारार्थी |
| २. | सोयीचे संतुलन प्रतिवादी क्र. १ ते ४ च्या बाजुने जाते, असे ते सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ३. | मनाई हुकूमाची दाद दिला नाही तर प्रतिवादी क्र. १ ते ४ चे अपरिमीत नुकसान होईल, असे ते सिध्द करतात काय ? | नकारार्थी |
| ४. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

# कारणमिमांसा

५)  वादीतर्फे व प्रतिवादींतर्फे कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत. मी दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकला आहे.

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबत -**

६)  सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रित कारणमिमांसेकरीता घेण्यात आले आहेत.

(७)  प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विद्वान विधीज्ञांनी अर्जातील कथनाप्रमाणे युक्तिवाद केला. वादी व प्रतिवादी क्र. ५ च्या विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या जबाबाप्रमाणे युक्तिवाद केला.

८)  प्रतिवादींनी मागणीप्रमाणे दाद मिळणेकरिता प्रथम दर्शनी वाद, सोयीचे संतुलन त्यांच्या लाभात जाते व मनाई हुकूम दिला नाही तर त्यांचे अपरिमित नुकसान संभवते या बाबी शाबीत करणे आवश्यक आहे.  प्रतिवादी क्र. १ ते ४ चे असे कथन आहे की वादींनी सदरचा दावा वाटप होवून पृथक कब्जाकरिता दाखल केला आहे. त्यांनी दाव्याला कैफियत देवून वादीचा दावा नाकारला आहे. दावा मिळकतीपैकी मौजे शेलगांव येथील गट क्र. २२७/२ ही जमीन प्रतिवादी शिंदे यांच्या एकत्र कुटुंबाची असून सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ चे सासरे भानुदास शिंदे यांनी तिचे दीर म्हणजे प्रतिवादी क्र. ५ धनंजय शिंदे यांच्या नांवे एकत्र कुटुंबाकरिता खरेदी केली आहे.  महाराष्ट्र महसुल अधिनियम कलम ८५ अन्वये पुन्हा सदर मिळकतीला भानुदास शिंदे यांचे नांव मालकी हक्कात लागले आहे. सदर मिळकतीबाबत न्यायालयात वाद चालू आहे.  सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा हिस्सेवारीप्रमाणे कब्जा असून ते जमिन वहिवाटून उत्पन्न घेत आहेत. प्रतिवादी क्र. १ च्या पतीच्या मृत्यूनंतर सदर मिळकतीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा हक्क अधिकार आहेत. असे असतनाही प्रतिवादी क्र. ५ ने दावा

न्यायप्रविष्ट असताना बेकायदेशीरपणे व अनाधिकाराने व मिळकतीचे वाटप झालेले नसताना सदर मिळकतीचे बक्षीसपत्र त्याचा मुलगा प्रविणकुमार यांच्या नावे केले आहे. प्रतिवादी क्र. ५ ला सदर बक्षीसपत्र करण्याचे व त्याव्दारे महसुल दप्तरी नोंदी घेण्याची कोणतेही अधिकार नाहीत. सदर बक्षीसपत्राच्या आधारे प्रतिवादी क्र. ५ हा प्रतिवादी क्र.१ ते ४ च्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. तसेच त्याने मिळकतीच्या बांधावरील पेरु, आंबा व चिंचेची झाडे प्रतिवादीच्या संमतीशिवाय तोडलेली आहे. त्याने सदर प्रतिवादींना जमिन वहिवाटू देणार नाही व झाडे तोडणार अशी धमकी दिलेली आहे. त्याप्रमाणे सदर प्रतिवादींनी त्याच्या व त्याच्या मुलाच्या विरुध्द पोलीसांना तक्रार दिलेली आहे. सदर मिळकतीच्या उत्पन्नावर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. प्रतिवादी क्र.५ ने हरकत अडथळा केला तर प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे अपरिमीत नुकसान होईल. करिता प्रतिवादी क्र. ५ ने स्वतः अथवा इतर कोणामार्फत सदर मिळकतीच्या प्रतिवादी क्र. १ ते ४ च्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व त्यांना जमिनीतून हुसकावून लावू नये असा मनाई आदेश प्रतिवादी क्र. ५ विरुध्द देण्यात यावा.

९) वादीने दाव्यात दुरुस्ती करून दिनांक ११/०७/२०२५ रोजीच्या बक्षीसपत्राबाबत दाद मागितलेली आहे. वादीच्या कथनानुसार सदर बक्षीसपत्र बेकायदेशीर असून ते दावा मिळकतीतील त्याच्या हिश्यावर बंधनकारक नाही.

१०) प्रतिवादी क्र. ५ च्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी खोटा अर्ज दाखल केला आहे ते स्वच्छ हाताने न्यायालयासेमार आलेले नाही. त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये गट क्र.२२७/२ या मिळकतीचा कोठेही उल्लेख केलेला नाही. सदर मिळकत त्यांची स्वकष्टार्जित आहे असा उल्लेख केलेला नाही. याउलट, त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये असे नमुद केले आहे की दाव्यातील कांही मिळकती या प्रतिवादी क्र.५ च्या स्वकष्टार्जित व नोकरीच्या पैशातून खरेदी केलेल्या मिळकती आहेत. यावरून विभक्त

कुटुंब होते हे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कबूल केले असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. ५ हा लकव्याच्या आजाराने गेली सात- आठ वर्षापासून त्रस्त आहे. दिनांक १३/०९/२०२५ रोजी तो घरी झोपून असताना देखील खोटा मजकुराचा अर्ज पोलीस ठाण्यात दिला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे प्रतिवादी क्र.५ ला व त्याच्या मुलाला विनाकारण खोटया केसेस मध्ये अडकविण्याची धमकी देतात. म्हणून त्याचा मुलगा प्रविणकुमार यांने पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना प्रथम दर्शनी वाद नाही. सोयीचे संतुलन त्यांच्या बाजूने जात नाही. मनाई हुकूम दिला नाही तर त्यांचे नुकसान संभवत नाही.

११) दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गट क्र. २२७/ २ ही मिळकत, दावा मिळकत म्हणून समाविष्ट आहे. सदर दाव्याचे कामकाज अद्याप प्रलंबित आहे. सदर मिळकत एकत्र कुटुंबाची मिळकत आहे की कोणा एका सहहिस्सेदाराची स्वकष्टार्जित मिळकत आहे हे अद्याप शाबीत होणे बाकी आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर अर्जाव्दारे प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध दाद मागितली आहे. वादींनी दाखल केलेल्या दाव्यामध्ये अशा प्रकारे सह प्रतिवादीविरुध्द दाद मागता येते हे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी स्पष्ट केले नाही. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रतिदावा दाखल केलेला नाही. त्यांनी जरी प्रतिदावा दाखल केला असता तरीही त्यांना केवळ वादी विरुद्ध प्रतिदाव्याव्दारे दाद मागता आली असती. सह प्रतिवादींना कोणत्याही परिस्थीतीत वादीच्या दाव्यात इतर सहप्रतिवादीविरुद्ध कोणत्याही प्रकारची दाद कायद्याने मागता येणार नाही. कारण दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६ (अ) हा केवळ वादीविरुद्ध प्रतिदाव्याबाबत तरतुदी स्पष्ट करतो. या सर्व विश्लेषणानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रथम दर्शनी वाद, सोयीचे संतुलन व मनाई हुकूम दिला नाही तर त्यांची होणारी अपरिमीत नुकसानी या बाबी शाबीत केल्या आहेत किंवा कसे हे पाहण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अर्ज कायदेशीर नसल्यामुळे तो नामंजूर होण्यास पात्र आहे. करीता

मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ४ तर्फे दाखल निशाणी क्र.६५ चा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

२. सदर अर्जाच्या खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. ५ यांना देण्यात यावी.

Digitally signed by REVATI MALLIKARJUN KANTE
Date: 2026.01.21 17:57:24 +0530

दिनांक – ०६/०१/२०२६

**( रेवती म. कंटे )**
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,बार्शी.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | G.L. Sutar, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. C.J.S.D. and A.C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 06.01.2026 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 06.01.2026 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 21.01.2026 |